शासकीय कार्यालयातील शिपायांच्या कामाच्या वेळेबाबत.

201601061038239607

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:समय १०८८/१९/अठरा [र.व का.],
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १७ मार्च, १९८९.

प रि प त्र क

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३१ ऑगस्ट १९८८, क्रमांक-समय १०८८/१९/अठरा [र.व का.] अन्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील शिपायांसाठी कामाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी ९.३० ते संध्याकाळी ६.१५ अशी ठेवण्यात आली आहे. ही वेळ संध्याकाळी ५.४५ पर्यन्त ठेवण्यात यावी, अशी शासनाकडे विनंती करण्यात आली आहे.

२. बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांची वेळ सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त असून अधिकारी व इतर कर्मचारी थांबल्यास शिपायांना ते कार्यालयातून जाईपर्यन्त थांबावे लागतेच. परंतु अशी गरज नसल्यास शिपायांना सहा वाजता जाऊ देण्यास हरकत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज. ज. ताम्हनकर

[ज.ज.ताम्हनकर]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x निबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
x निबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x निबंधक, लोकआयुक्त, मुंबई,
x निबंधक, उपलोकआयुक्त, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
बृहन्मुंबईतील सर्व शासकीय कार्यालये.